**Indian Streams Research Journal**
Vol-1 Issue-5/June-2011
**ISSN: 2230-7850**
Available online www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# भावी पिढीची जडणघडण व गुरुच्या भूमिकेतील आई

अरविंद देशमुख
सहयोगी प्राध्यापक
गो.सी.टोंपे
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सांदूरबाजार अमरावती

समाजस्वास्थ पर्यायाने कुटूंबस्वास्थ निर्माण होण्यासाठी आणि भावी पिढीच्या जडणघडणीसाठी 'गुरुच्या भूमिकेतील आई ' हीच घरातील आईची भूमिका आवश्यक आहे. यामुळेच संस्कारक्षम, संवेदनशील पिढी निर्माण होईल. यासाठी 'मातृमुखेन शिक्षणम ' म्हणजेच आई हीच प्रथम गुरु आहे. या जाणिवेतूनच महात्मा जोतिबा फुले यांनी एका स्त्रीला शिक्षण दिले तर ते सर्व कुटूंबाला दिल्यासारखे आहे. अशी भूमिका मांडली होती. यादृष्टीनेच संत तुकडोजी महाराज, आचार्य विनोबा भावे आणि अमरावतीचे श्री गुलाबराव महाराज यांनी गुरुच्या भूमिकेतील आईच मुलांचे पर्यायाने भावी पिढीचे चांगले संगोपन करेल अशी वैचारिक मांडणी केले आहे.

## संत तुकडोजी महाराज

संत तुकडोजी महाराज हे मुळचे विदर्भातील होते. त्यांना राष्ट्रसंत म्हणून संबोधले जाते. त्यांचे मूळ नांव माणिक बंडोजी ठाकूर असे होते. इ.स. 1909 ते 1968 हा त्यांचा कालखंड. शिक्षण इयत्ता तिसरी पर्यंतच झाले पण त्यांचा लहानपणापासून ईश्वर भक्तीकडे ओढा होता. विदर्भातील वरखेड येथील नाथपंथीय साधू, आडकोजी महाराज यांच्याकडे बालवयातच आकृष्ट झाले. पुढे त्यांनी आडकोजी महाराजांना गुरु मानले. आडकोजी महाराजांनी माणिक यास तुकडया असे नांव दिले. यामुळे पुढे ते तुकडोजी महाराज या नावाने ओळखले गेले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी भारतभर भ्रमण केले होते. भारतीय स्वातंत्र्यचळवळीतही त्यांचा सहभाग होता इ.स. 1942 च्या 'चलेजाव चळवळ' त्यांनी विदर्भातील खेडयापाडयात पोहोचविली होती. त्यांनी समाजसुधारणेबाबतही कार्य केले होते. त्याचबरोबर तुकडोजी महाराज यांनी स्त्रीयांच्या भूमिकेबाबत सामर्थ्याबाबतही मते मांडली आहेत.

" काय देवे देवता भिन्न केल्या ? ऋषी पत्न्या नव्हत्या सांभाळल्या ? ।
कायम महिलात साध्वी नाही झल्या ? पहा पुराणी मागच्या ।। 49 ।।

काय स्त्रियांनी नाही लिहीले वेद ? नाही केल्या ब्रम्हवाद ? ।
नाना विदयाकला - भेद । यात प्रवीण कितीतरी ।। 50 ।।
काय स्त्रियांनी युध्द नाही केले । पति,पुत्रा नाही प्रोत्साहन दिले ।
काय स्त्रियानं प्राण नाही अर्पिले । ब्रीदासाठी ? ।। 51 ।।
हजारो स्त्रिया फुलांहूनि नाजुका । ब्रीदासाठी जाहल्या खाक ।
त्यांचे करावे तेवढे कौतुक । थोडेचि आहे ।। 52 ।।"

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी स्त्री सामर्थ्य व स्त्रियांच्या अनावस्थेत राष्ट्राची दुर्गती याचे स्पष्ट दिर्गदर्शन यांत केलेले आहे. सोबतच शिक्षणाशी निगडीत क्षेत्रातील स्त्रियांचा उल्लेखनीय सहभाग वर्णिला आहे. मातृगौरव करतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात कमी---

" याच गुणे मातृदेवो भव । वेदाने आरंभीच केला गौरव ।
नररत्नांची खाण अपूर्व । मातृजाती म्हणेनिया ।। 8 ।।
प्रल्हादाची कयाधु आई । छत्रपतीची जीजाबाई ।
कौसल्या, देवकी आदि सर्वही । वेदिल्या ग्रंथी ।। 9 ।।"

वरील रचनेत राष्ट्रसंतानी स्त्रियांची मौलिक वैशिष्टये वर्ण करीत मातृमहिमा सांगितला आहे. गुरुहून अधिक संस्कार करण्याचे सामर्थ्य मातेच्या ठिकाणी आहे हे राष्ट्रसंतानी खालील शब्दातून सांगितले आहे.

" विदया, गुरुहुनि थोर । आदर्श मातेचे उपकार ।
गर्भापासोनि हिचे संस्कार । बालकांवरी ।। 2 ।।
जिच्या हाती पाळण्याची दोरी । तीच जगाते उध्दारी ।
ऐसी वर्णिली मातेची थोरी । शेकडो गुरुदुनिही ।। 3 ।।"

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी वरीलप्रमाणे स्त्रीचे जे वर्णन केले आहे. त्यावरुन स्त्रीमध्ये असणाऱ्या सामर्थ्याची जाणिव होतेच पण त्याचबरोबर मुलांच्या जडणघडणीत आईची भूमिका किती मोलाची असते हे स्पष्ट होते.

## आचार्य विनोबा भावे

आचार्य विनोबा भावे हे गांधीवादी व सर्वोदयी नेते होते. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. इ.स. 1885 ते 1982 हा त्यांचा कालखंड होय. त्यांनी वयाच्या दहाव्या वर्षीच आजन्म ब्रम्हचर्य पाळण्याची प्रतिज्ञा केली व त्याचे शेवटपर्यंत पालन केले. भूदान चळवळीचे ते प्रणेते होते. इ.स. 1975 मध्ये भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' या पदवीने सन्मानित केले होते. आईनेच मुलाचा गुरु व्हावे या अनुषंगाने आचार्य विनोबा भावे यांनीही विवेचन केले आहे. विनोबा भावे म्हणतात की,

"लहान मुलांना जे शिक्षण द्यायचे ते शाळेत नाही मिळणार, ते आईच देऊ शकेल. म्हणून कंठातच ज्ञान पाहिजे. लहानपणी किमान दहाहजार तरी कविता पाठ असायला हव्यात आणि ते सहज शक्य आहे. सहाव्या वर्षापासून पाठ करायला सुरुवात केली, रोज एक श्लोक पाठ करायचा असे ठरविले तर वर्षातले दहा वीस दिवस सोडून दिले तरी 350 कविता दरवर्षी पाठ होती, आणि 30 वर्षात म्हणजेच 36 व्या वर्षी दहाहजार श्लोक पाठ होऊन जातील. ज्ञानेश्वरीच्या दोन तीन हजार ओव्या, तुकारामाचे दोनचारशे अभंग, एकनाथी भागवताच्या कांही ओव्या अलोकडोल कविता असे सर्व पाठांतर असेल म्हणजे मग घरात 'आई ' काम करता करता जे म्हणेल ते मुलाला सहज ऐकून पाठ होईल." विनोबा भावे यांच्या चिंतनानुसार, जेवढे म्हणून गुण आहेत ते स्त्रीलिंगी आहेत भक्ति, शक्ति, नीति इत्यादी गीतेत श्लोक आहे. 'वाणी श्री कीर्ति नारीन । क्षमा मेधा धृति, स्मृति' इत्यादी सर्व स्त्रीरुपे आहेत. म्हणूनच विनोबा सारे लहानपणाचे शिक्षण स्त्रियांच्या हातात असले पाहिजे. असे प्रतिपादन करतात. विनोबा भावे पुढे असेही म्हणतात की, " पूर्वी अशी समजूत होती की छडी मारल्याने विदया येते. मास्तराने छडी काढली की विदया आठवण्याचे तर सोडाच, असलेली विदयाच निघून जायची । विदया अशी मारण्याने का येईल ? ती प्रेमाने समजावून सांगण्याने येत असते. त्यासाठी मातृमुखातून ज्ञान मिळाले पाहिजे म्हणून कृष्णाने सांदीपनी ऋषींना 'मातृहस्तेन भोजनम् ' असा वर मागितला. 'मातृमुखेन शिक्षणम्' असे ते म्हणाले नाहीत, तेवढे माझ्यासाठी म्हणायला शिल्लक ठेवले " अशी विनोबा भावे यांची आईनेच मुलाचे गुरु होऊफन त्यास शिकवावे अशी वैचारिक मांडणी होती.

## **श्री गुलाबराव महाराज**

श्री गुलाबराव महाराज मूळचे अमरावती जिल्हयातील .................. या गावचे इ.स. 1881 ते इ.स. 1915 असे त्यांचे अल्पायुष्य होते. त्यांनी भक्ती, उपासना, आर्यधर्म, स्त्रीशिक्षण याबाबत विचार मांडले. पण त्याचबरोबर त्यांनी 'मातृमुखेन शिक्षणम' म्हणजेच आई हीच प्रथम गुरु याचे जोरदार समर्थन केले होते.

मातृमुखेन शिक्षणम् आई हीच प्रथम गुरु मानल्यामुळे आईचे म्हणजेच स्त्रीशिक्षण अपेक्षित आहे. इतकेच नव्हे तर वर्तमान शिक्षण प्रणालीत शिक्षकाने मातृहृदयाने शिकवावे असे श्री गुलाबराव महाराज यांना अपेक्षित होते. श्री गुलाबराव महाराज यांनी कन्या, पत्नी आणि माता इत्यादी स्त्रिच्या भूमिका विशद करत मातेने कुटूंबामध्ये गृहशिक्षण कशाप्रकारे दयावे. याचेही स्पष्ट मार्गदर्शन केले आहे.

"स्त्री धर्माचे ठिकाणी दासी,  
अर्थाचे ठिकाणी मैत्रीण,  
कामाचे ठिकाणी स्वामिनी,  
मोक्षाच्या ठिकाणी स्वतंत्र आहे."

स्त्रीच्या मानसिक विचारांचा परिणाम हा गर्भावर होत असल्यामुळे स्त्री ही शारीरिक व मानसिक दोन्हीदृष्टीने स्वस्थ असावी तिचे मन उल्हसित व प्रसन्न राहण्यासाठी तिने कथा, पुराणे इत्यादी वाङःमय वाचावे, मन जास्तीत जास्त कृष्णभक्ती रममाण करावे. यासोबतच मातेने जुने व नवे यांचा मेळ बसवून कालानुरुप कौटूंबिक शिक्षण दयावे, आई-वडील अतिर्थीची सेवा करणे, प्रेमाने बोलणे, गुरु, वृध्दमंडळी रागावली तर क्षमा मागणे, आनंदाने, ईर्षा मनात न धरता सुधारणा करावी. संपत्तीत गर्व धरु नये, विपत्तीत धैर्य सोडू नये. लीनता अंगी बाळगावी. तसेच लहान मुलांचे सतत लाड करु नये असे विवेचन श्री गुलाबराव महाराज यांनी स्त्री - स्त्रीविषयी केले आहे. पुढे ते म्हणतात की, आज आपल्या विस्कळीत झालेल्या समाजाची घटना सुधारण्यासाठी स्त्रियांना शिक्षण देणे अगदी आवश्यक आहे. मुलांना बाप शिक्षण देऊ शकतो, आईच कशाला सुशिक्षित असली पाहिजे ? असे म्हणणे योग्य नाही. कारण मुलांचा लहानपणापासून आईशी जितका निकटचा संबंध असतो तितका बापाशी असत नाही. एकूणच स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांना योग्य रितीने सुसंस्कृत करण्याविषयी पुरुषवर्गाने अनास्था दाखवू नये, आईपेक्षा श्रेष्ठ दैवत दुसरे कोणतेही नाही. न मातु: पर दैवतम । अशीच प्राचीन भारतीय धारणा आहे. कुटूंब या पाठशाळेतील शिक्षक म्हणून प्रथम भूमिका आईचीच आहे. म्हणून मातृमुखातूनच शिक्षण दिले पाहिजे. अशी आग्रही भूमिका श्री गुलाबराव महाराज यांनी मांडली आहे.

**सारांश :**

एकूणच वरील प्रमाणे वेदान्तशास्त्राप्रासून ते संत तुकडोजी महाराज यांच्यापर्यंत अनेकांनी घरातील आईला शिक्षण मिळाले पाहिजे. तिनेच गुरुच्या भूमिकेतून आपल्या मुलांना शिकविले पाहिजे. तरच संस्कारक्षम पिढी घडेल ही पिढी संवेदनशील असेल. आणि समजाचे होणारे अध:पतन थांबेल या अनुषंगाने मांडणी केली आहे. आज समाजाचे जे अध:पतन सुरु आहे. त्या पार्श्वभूमीवर वरील विवेचन फार उपयुक्त असेच आहे.

**संदर्भ :**


1) भिडे जी.एल., एन.डी.पाटील, थोरात जी.एस. -- महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर
2) दिक्षित एन. नेपोलियन बोनापार्ट
3) स्वमत निर्ण, श्री गुलाबराव महाराज, प्रकाश श्री ज्ञानेश्वर मधुराद्वेत सांप्रदायिक मंडळ, अमरावती
4) डॉ. खरे अंजली-- प्रज्ञाचक्षु श्री गुलाबराव महाराज यांचे विचारवैभव लेखश्री महाराजांचा आर्य अनार्य विचार, प्रकाशक- भारतीय विचार मंच, नागपूर
5) नित्यपाठ, प्रकाशक- श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, अमरावती
6) प्रज्ञाचक्षे श्री गुलाबराव महाराज यांचे विचारवैभव, प्रकाशक- भारतीय विचार मंच, नागपूर

साधुबोध, श्री गुलाबराव महाराज विरचित, प्रकाशक -- श्री गुलाबराव महाराज सर्वोदय ट्रस्ट, आळंदी.